महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# बाह्य परोपजीवी नियंत्रण





गोचिड, गोमाशा, उवा, लिखा, पिसवा आदी बाह्य परोपजीवींमुळे जनावरांची अपरिमीत हानी होते. बाह्य परोपजीवींच्या प्रादुर्भावामुळे जनावरांच्या आरोग्यावर व उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. जनावरांवर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी बाह्य परोपजीवींचे प्रभावी नियंत्रण होणे अत्यंत गरजेचे आहे.

**बाह्य परोपजीवीमुळे होणारे दुष्परिणाम**

- जनावर अस्वस्थ होते.
- दूध उत्पादनात घट होते.
- प्रजोत्पादन क्षमता घटते.
- शरीराची वाढ खुंटते.
- रोग प्रतिकारशक्ती कमी होते.
- रक्तक्षय होतो.
- कातडीचे आजार होतात.
- प्राणघातक रोग होतात.

## बाह्य परोपजीवीचे नियंत्रण कसे करावे ?

- बाधित जनावरांत दर १५ दिवसांनी अंगावर किटकनाशकाची फवारणी करावी.
- अंगावर गोचिड कमी प्रमाणात असतील तर ते हाताने काढून जाळून टाकावेत.
- गोठ्याच्या भिंती गुळगुळीत ठेवाव्यात.
- गोठ्यात २ ते ३ आठवड्याच्या अंतराने किटकनाशकाची फवारणी करावी.
- गोठ्यातील खाचाखळगा जाळून घ्याव्यात.
- जनावरांची, गोठ्याची व परिसराची स्वच्छता राखावी.
- गोठ्यात व परिसरात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
- जनावरांना नियमित खरारा करावा.
- म्हशींच्या पारडांचे केस वेळोवेळी कापावेत.
- म्हशींना दर दोन महिन्यांनी भादरून घ्यावे.
- जनावरांना उत्तम खुराक व क्षारमिश्रणे द्यावीत.

**बाजारात वेगवेगळ्या नावाने गोचिडनाशक (किटकनाशक) औषधी उपलब्ध आहेत. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने किंवा औषधी कंपनीच्या सुचनेनुसार ही औषधी वापरण्यात यावी.**

**करा बाह्य परोपजीवी नियंत्रण ।**
**मिळेल अधिक पशु उत्पादन ।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर